**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**

(A Government of Maharashtra Undertaking)

**Dadasaheb Phalke Chitranagari**

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याचा 76 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

दाफचि 15: महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याचा 76 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांनी महामंडळाच्या सर्व अधिकारी-कर्मचारी, निर्मितीसंस्थांना शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, डॉ. ढाकणे यांनी दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसरातील चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या पूर्णाकृती आणि अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सह व्यवस्थापकीय संचालक गीता देशपांडे यांच्यासह महामंडळाचे अधिकारी- कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.............

**जनसंपर्क विभाग**